Research Paper Education

# “आकाशवाणी या प्रसारमाध्यमाचा अध्यापनातील उपयुक्ततेचा तुलनात्मक अभ्यास”

*डॉ. निवेदिता देशमुख

*विभागप्रमुख शिक्षणशास्त्र विभाग पद्मश्री डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठ, नेरूळ, नवी मुंबई.

ABSTRACT

शिक्षणाच्या आधुनिक पद्धती, शिक्षणाचा वाढता विस्तार या सर्व तंत्रविज्ञानाच्या समावेशात शिक्षण पद्धतीमध्ये कमी वेळात अधिक परिणामकारक शिक्षणाची आवश्यकता सर्व स्तरावरच्या विद्यार्थ्यांना आहे. आपल्याभोवती उपलब्ध साहित्याला, प्रसारमाध्यमांना, ज्ञानात्मक, मनोरंजनात्मक, कलात्मक कृतीद्वारे माहितीसंवर्धनाचे साहित्य कसे बनवता येईल याचा शिक्षकाने विचार करणे आवश्यक आहे.

वेळेची, श्रमाची आणि अर्थ बाबींची योजना करून अधिक लोकांपर्यंत आपले अध्यापन पोचवणे आजच्या काळाची गरज आहे. विद्यार्थ्यांना व्यक्तीमत्व विकास प्रसारमाध्यमांद्वारे साध्य करता येतो का? हे पाहण्यासाठी संशोधिकेने आकाशवाणी या प्रसार माध्यमांतर्गत विद्यार्थ्यांना अध्ययन अनुभव देवून वर्गाध्यापन व प्रसारमाध्यमाद्वारे अध्यापनाची व्यक्तीमत्व विकासातील फरकाची परिणामकारकता अजमावून पाहिली

उद्दिष्टे

- विद्यार्थ्यांच्या वर्गाध्यापनाद्वारे व्यक्तिमत्व विकासाची परिणामकारकता पडताळणे
- विद्यार्थ्यांच्या प्रसारमाध्यम (आकाशवाणी) द्वारे देण्यात येणाया अध्ययन अनुभवाची व्यक्तीमत्व विकासाची परिणामकारकता पडताळणे.
- विद्यार्थ्यांच्या वर्गाध्यापनाद्वारे दिल्या जाणाया अध्ययन अनुभव व आकाशवाणीद्वारे दिलेल्या अध्ययन अनुभवाचा तुलनात्मक अभ्यास करणे.

कार्यकारी व्याख्या

व्यक्तिमत्व विकास विद्यार्थ्यांच्या क्रियाहिनता किंवा कोणत्याही कार्यक्रमास सहभागी होण्याविषयी होकारार्थी निर्णय देण्यास प्रवृत्त करणे. तद्वतच विद्यार्थ्यांच्या अध्ययनासंबंधी नवीन कार्यक्रमांमध्ये सहभागी होण्यास अभिरूची वाढवणे.

वर्गाध्यापन – विद्यार्थ्यांद्वारे वर्गात सादरीकरण करून अध्ययन अनुभव देणे.

आकाशवाणीद्वारे अध्यापन आकाशवाणी या प्रसारमाध्यमाच्या सहाय्याने एखादा विषय किंवा घटक शिकवणे.

गृहितके

- विद्यार्थ्यांना विविध प्रसारमाध्यमांद्वारे अध्ययन अनुभव देता येतात.

परिकल्पना

- सदर संशोधनासाठी शून्य परिकल्पना मांडण्यात आली.

मर्यादा

- सदर संशोधनात पद्मश्री डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठातील शिक्षर्ण शास्त्र विभागाच्या विद्यार्थ्यांपुरतेच मर्यादित आहे.

संशोधन पद्धती

- सदर संशोधनासाठी प्रायोगिक पद्धतीचा वापर केला गेला.

साधने

- सदर संशोधनाच्या अध्ययन अनुभव देताना संवाद पद्धतीने एक पाठ शिकवून व दुस–या गटास पारंपारिक पद्धतीने शिकवून प्रश्नावलीद्वारे दोन्ही गटाची परिणामकारकता पडताळून पाहण्यात आली.

प्रश्नांची निर्मिती

- संशोधिकेद्वारे प्रश्नावली निर्माण करण्यात आली. प्रश्नावली २५ गुणांची होती. शिकविलेल्या पाठावर आधारित वस्तुनिष्ठ प्रश्न, भावनात्मक प्रश्न व व्यक्तिमत्व विकासावर आधारीत निबंधवजा प्रश्न यांचा समावेश प्रश्नावलीमध्ये करण्यात आला होता.

न्यादर्श

- प्रत्येक गटात २० विद्यार्थ्यांचा समावेश करण्यात आला.
- दोन्ही गट मिळून विद्यार्थी संख्या ४० होती.
- विद्यार्थी व विद्यार्थीनी दोन्हींचाही न्यादर्शात समावेश करण्यात आला होता.

माहितीचे विश्लेषण

सदर संशोधनाचे प्राप्त माहितीचे विश्लेषण ‘त’ चाचणीद्वारे करण्यात आले.

प्रत्यक्ष कार्यवाही

- शिक्षणशास्त्र विषयाच्या पदवी अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना अध्यापनाच्या विविध पद्धतींचा शालेय पाठांमध्ये समावेश करावा लागतो. आधुनिक शैक्षणिक तंत्र विज्ञानात अनेक तांत्रिक साहित्यांचा समावेश होतो. ज्याचा अध्यापन अनुभव देताना समावेश करता येतो. विद्यार्थ्यांच्या विकासामध्ये फक्त ज्ञानात्मक विकास हाच एकमेव उद्देश नसून भावनिक, शारीरिक यासोबत व्यक्तिमत्व विकासही आवश्यक ठरतो.
- प्रसारमाध्यमांचे आज विद्यार्थ्यांना फार आकर्षण आहे. वेगवेगळया प्रसारमाध्यमांच्या अनेक शाखा कार्यरत आहे. शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक, कलात्मक, क्रिडात्मक इत्यादी अनेक क्षेत्रातील कार्यक्रमांचा त्यात समावेश असतो. कमी वेळात अधिक लोकांपर्यंत सहज पोहचवर्ण याचे ते एक प्रभावी साधन आहे.

सदर संशोधनात पद्मश्री डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठ, नेरूळ, नवी मुंबई यांच्या अंतर्गत चालविले जाणारे ९०.०४ ‘ज्ञानवाणी’ या सामाजिक रेडिओ ह्यछेम्मुन्तिय्ृर्देहि याद्वारे विद्यार्थ्यांना महात्मा फुले यांच्या जीवन कार्यावर आधारित संवाद पद्धतीने पाठाचे नियोजन करून विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष पाठ घेतला.

- दुसया गटातील विद्यार्थ्यांना महात्मा फुले यांच्या जीवन कार्याची पारंपारीक पद्धतीने वर्गाध्यापनाद्वारे माहिती देण्यात आली.
- दोन्ही गटांना अध्ययन अनुभव दिल्यानंतर संशोधिकेने निर्माण केलेली चाचणी सोडविण्यास देण्यात आली.

प्रमुख निष्कर्ष

विद्यार्थ्यांना पारंपारिक पद्धतीने दिलेल्या अध्ययन अनुभवात ज्ञानात्मक बाबी फक्त ५०ट लक्षात राहिल्या. तद्वतच प्रत्यक्ष महात्मा फुले यांच्या जीवन कार्याचा भावनिक परिणाम विद्यार्थ्यांवर झाल्याचे आढळून आले नाही.

- विद्यार्थ्यांना आकाशवाणीद्वारे दिलेला अध्ययन अनुभव ज्ञानात्मक व भावनात्मक दोन्ही ठिकाणी परिणामकारक ठरला.
- याद्वारे विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांचा विकास साधणे सहज शक्य होते. विद्यार्थ्यांना यातून संवाद वाचनाची सवय नाविन्यपूर्णता आणण्याचा अनुभव घेता आला.

परिकल्पनेचा त्याग दोन्ही गटाच्या अध्ययन अनुभवाच्या परिक्षणामध्ये लक्षणीय फरक आढळून आल्यामुळे शून्य परिकल्पनेचा त्याग करण्यात आला.

सदर पद्धतीचे फायदे

- संघिककार्य व सांघिक अध्यापनात विकास घडवून आणता येतो.
- नियोजन क्षमतेचा विकास घडवून आणता येतो.
- सादरीकरण आणि आत्मपरिक्षण या कौशल्यांचा विकास साध्य होतो.
- आत्मविश्वास, भाषा विकास याद्वारे साध्य करता येते. हे माध्यम भाषा, विज्ञान, इतिहास, भूगोल या विषयासाठी उपयुक्त ठरते.

## REFERENCES

○प्रसारमाध्यमाच्या विद्यार्थ्यांमध्ये असलेल्या आकर्षणाचा अभ्यासक्रमाद्वारे योग्य अध्ययन अनुभव देण्यास शाळेने उपक्रम राबवावे. ऽ ○विविध दिन साजरे करताना आकाशवाणी या प्रसारमाध्यमाद्वारे शालेय व महाविद्यालयीन स्तरावर विविध कार्यक्रमांचे प्रसारण करावे. ऽ ○शिक्षक, विद्यार्थी यांसह समाजातील शैक्षणिक कार्याच्या प्रचार प्रसारासाठी या माध्यमाचा उपयोग विविध अभ्यासक्रमांची माहिती देण्यास विविध उपक्रम, कार्यक्रम इत्यादी च्या माहितीच्या प्रसारणासाठी करावा. ऽ